रयत शिक्षण संस्थेचे,
राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूर.
मराठी भाषा संवर्धन पंधरवडा अहवाल२०२१-२०२२

दिनांक १४ ते २८ जानेवारी दरम्यान मराठी भाषा पंधरवडा सर्वत्र उत्साहात साजरा करण्यात येतो. राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालयामध्येही मराठी भाषा पंधरवडा विविध उपक्रम घेऊन उत्साहात साजरा करण्यात आला. मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिनित्त 'मराठी भाषा स्नेही मंडळ' स्थापन करण्यात आले. यामध्ये मराठी विभाग व महाविद्यालयाचा अंतर्गत गुणवत्ता कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय ऑनलाइन प्रश्नमंजुषा स्पर्धा १४ ते २८ जानेवारी या कालावधीत घेण्यात आली. या स्पर्धेत एकूण १२७ स्पर्धकांनी सहभाग घेतला. मराठी साहित्यातील विविध प्रश्नांचा समावेश या प्रश्नमंजुषेत करण्यात आला होता.

१६ जानेवारी -२०२२ रोजी परिमल भित्तिपत्रिकेचे उद्घाटन महाविद्यालयाच्या कला शाखा प्रमुख डॉ.भाग्यश्री पुणतांबेकर मॅडम यांच्या हस्ते करण्यात आले. विद्यार्थी विद्यार्थिनींनी मराठीतील नामवंत साहित्यिकांचा परिचय व त्यांच्या साहित्याचा परिचय करून देणारा परिमल अंक तयार केला होता याचे प्रकाशनही यावेळी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. मराठी विभाग प्रमुख डॉ. सिंधू आवळे ,सहा.प्राध्यापक अंकुश घुले डॉ. महेश रणदिवे तसेच इतर प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होते .

मराठी भाषा पंधरवड्यातील तिसरा महत्त्वाचा उपक्रम म्हणजे मराठी विभागाच्या विभाग प्रमुख डॉ. सिंधू आवळे लिखित 'साहित्य आस्वाद 'या पुस्तकाचे विशेष प्रकाशन २० जानेवारी २०२२ रोजी करण्यात आले. साहित्य आस्वाद या पुस्तकाविषयी लेखिका डॉ. सिंधू आवळे, कला शाखा प्रमुख डॉ. भाग्यश्री पुणतांबेकर, भूगोल विभागप्रमुख डॉ. एम.डी कदम, प्रा.अंकुश घुले, डॉ. महेश रणदिवे यांनी आपली मते व्यक्त केली. उपस्थित सर्व विद्यार्थी व प्राध्यापक यांना पुस्तक परिचय करून देण्यात आला. मराठी भाषेचा प्रचार व प्रसार व्हावा तसेच मराठी भाषेचे संवर्धन व्हावे हा उद्देश या विविध उपक्रमांमागे होता. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. महेश रणदिवे यांनी केले. तर आभार प्रा. अंकुश घुले यांनी व्यक्त केले.

अशाप्रकारे मराठी भाषा संवर्धन पंधरवडा विविध कार्यक्रम घेऊन साजरा करण्यात आला.हा भाषा पंधरवडा विविध उपक्रम घेऊन साजरा करण्यासाठी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. आर. एस. डुबल साहेब यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केले.

संयोजक
प्रा.अंकुश घुले

RAJARSHI CHHATRAPATI SHAHU COLLEGE
KOLHAPUR

प्र. प्राचार्य,
राजर्षि छ. शाहू कॉलेज,
कोल्हापूर.

रयत शिक्षण संस्थेचे,
राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूर.
मराठी विभाग २०२१-२२

मराठी भाषा स्नेही मंडळ २०२२

आपल्या माविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने 'मराठी भाषा स्नेही मंडळ' स्थापन करण्यात येत आहे. या मंडळाच्या माध्यमातून मराठी भाषेच्या संबंधाने विविध उपक्रम घेण्यात येणार आहेत. या मंडळाच्या विविध पदावर आपली नेमणूक केली जात आहे.याकामी आपण उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे आणि मातृभाषेच्या संवर्धनासाठी प्रयत्न करावेत.

| अ.क्र. | सदस्याचे नाव | पदाचे नाव |
|---|---|---|
| १. | प्रा. डॉ. सिंधू आवळे | अध्यक्ष |
| २. | प्रा.डॉ.महेश रणदिवे | उप-अध्यक्ष |
| ३. | प्रा. अंकुश घुले | संयोजक |
| ४. | प्रा. नीता साठे | सदस्य |
| ५. | प्रा.डॉ.नेहा देसाई | सदस्य |
| ६. | प्रा.डॉ.मधुरा देसाई | सदस्य |
| ७. | चि.अमर कांबळे | सदस्य |
| ८. | कु.आशिकी कांबळे | सदस्य |
| ९. | कु. गायत्री बुरुड | सदस्य |
| १० | चि. प्रतिक जाधव | सदस्य |

संयोजक
प्रा.अंकुश घुले

CHHATRAPATI SHAHU COLL... KOLHAPUR

प्राचार्य

प्र.-प्राचार्य
राजर्षी छ. शाहू कॉलेज,
कोल्हापूर.

मराठी भाषा संवर्धन पंधरवडानिमित्ताने ग्रंथ प्रकाशन सोहळा







RAJARSHI CHHATRAPATI SHAHU COLLEGE ★ KOLHAPUR







RAJARSHI CHHATRAPATI SHAHU COLLEGE ★ KOLHAPUR